**शांत रहा! घाबरू नका! साप चावलेल्या व्यक्तीस धीर द्या!**

**हे करावे**

- साप चावलेला अवयव स्थिर ठेवावा. यामुळे रक्तदाब सामान्य राहील व शरीरात विष पसरण्याचा वेग कमी होईल.
- साप चावलेल्या अवयवावरील दागिने, घड्याळ वगैरे त्वरित काढावे कारण सर्पदंशामुळे मोठ्या प्रमाणात सूज येऊ शकते.
- सर्पदंश झालेल्या व्यक्तीला अशाप्रकारे बसवावे किंवा झोपवावे जेणेकरून सर्पदंश झालेली जागा हृदयाच्या पातळीपासून खाली असावी.
- सर्पदंश झालेला अवयव क्रेप बँडेज अथवा कापडी पट्टी व काठी अथवा लाकडी पट्टीच्या सहाय्याने बांधून ठेवावा जेणेकरून त्या अवयवाची हालचाल होणार नाही. क्रेप बँडेज कापडी पट्टी बांधताना फार घट्ट बांधू नये.

**हे करू नये**

- सर्पदंश झालेल्या ठिकाणी कापू नये व अन्य कोणत्याही प्रकारे विष काढण्याचा प्रयत्न करू नये. सर्पदंश झालेली जागा स्वच्छ व कोरड्या कापडाने झाकावी.
- आवळपट्टीचा वापर करू नये किंवा सर्पदंश झालेली जागा बर्फाने शेकू नये.
- चहा, कॉफी, मद्य अशा कोणत्याही उत्तेजक द्रव्यांचे सेवन करू नये.
- सापाला पकडण्याचा प्रयत्न करू नये. लांबून तुमच्या मोबाईलने छायाचित्र काढण्याचा प्रयत्न करा, त्यावरूनही साप विषारी आहे कि बिनविषारी याचा अंदाज बांधता येऊ शकतो.

सर्पदंश विषारी असल्याची खात्रीशीर लक्षणे दिसू लागल्या नंतरच त्यावर उपचार सुरु करावेत. सर्पदंश झालेल्या जागेतून अतिरिक्त रक्तस्त्राव, श्वासोच्छवासात अडथळा येणे, पापण्या जड होणे, सर्पदंश झालेल्या जागी प्रचंड सूज येणे हि विषारी सर्पदंशाची काही प्रमुख लक्षणे आहेत.

भारतात आढळणाऱ्या सापांपैकी फक्त २०% जाती विषारी आहेत व त्यातील बरेचसे साप मनुष्याला हानिकारक नाहीत.

सर्पदंशापासून वाचण्यासाठी त्यावरील योग्य औषधोपचार हा एकमेव इलाज आहे. मांत्रिक, जडीबुटी वाले अशा लोकांच्या नादी कृपया लागू नका.



